# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्स


**प्रेसनोट २६४-२२** **दिनांक २७/०८/२०२२**

## रात्रीची घरफोडी करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन ४ गुन्हयांची उकल. गुन्हे शाखा, कक्ष- ३ विरार यांची कामगिरी.

-------ooooo-------

दि.१३/०८/२०२२ रोजी ००.३० वा.पासुन ते ०४.०० वा. च्या दरम्यान फिर्यादी सौ. डालादेवी शांतीलाल खंडेलवाल, वय ६२ वर्षे यांचे व साक्षीदार यांचे घरात अज्ञात चोरटयाने किचनच्या खिडकीचे गज वाकवुन त्यावाटे प्रवेश करुन रोख रक्कम, मोबाईल फोन व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण ३,२२,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमालाची चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ७६५/२०२२ भा.दं.वि. कलम ३८०,४५७ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गेल्या काही महिन्यापासुन रात्रीच्या घरफोडी चोरीच्या गुन्हयांच्या प्रमाणात वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभीर्याने दखल घेवुन आरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. सदर सूचनांच्या अनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार येथे कार्यरत अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक व गुप्त बातमीदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे नरेंद्रसिंग दिलीपसिंग ठाकुर, वय ५२ वर्षे, रा. मंडाला झोपडपट्टी, मानखुर्द, मुंबई यास ताब्यात घेवून त्याच्याकडून ४७,५५०/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तपासा दरम्यान आरोपीताने खालील ४ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास विरार पोलीस ठाणे करीत आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे –**

| अ.क्र. | पो.स्टे. | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे | ७६५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३८०,४५७ प्रमाणे. |
| २. | विरार पोलीस ठाणे | ६७१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ३. | विरार पोलीस ठाणे | ७७९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ४. | विरार पोलीस ठाणे | ७९६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं.राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम - गुन्हे शाखा, कक्ष - ३, विरार यांनी पार पाडली आहे.

----oooo----